" लोकांचे दोस्त (Friends of People)"- २००६
वार्षिक लेखा परिक्षण लेखे व आयकर विवरण सादर
न केल्यामुळे या पक्षाची नोंदणी रद्द करण्याबाबत .

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रापनों-२०१५/प्र.क्र.२१/का.११,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २०.०४.२०१६

## आ दे श

राज्यामध्ये लोकशाहीचे बळकटीकरण व्हावे व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाद्वारे निवडणूक लढविण्यावर भर देण्यात यावा या उद्देशाने राज्य निवडणूक आयोगाने "महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्ह वाटप आदेश" २००४ व क्रमांक-एसईसी/२००९/सीआर-४९/का.११, दि. ३१/०३/२००९ आदेश पारित केले आहेत.

२. या अधिसूचनेनुसार " कोणतीही संस्था किंवा राजकीय पक्ष म्हणून स्वत:स म्हणवून घेणाऱ्या व्यक्तीची संस्था किंवा भारत निवडणूक आयोगाकडे यापूर्वीच नोंदणी झालेला राजकीय पक्ष " राज्य निवडणूक आयोगाकडे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या प्रयोजनाकरिता राजकीय पक्ष म्हणून नोंदणीसाठी अर्ज करु शकतो. सदर संस्था किंवा पक्ष यांनी विहित बाबींची पूर्तता केल्यावर राज्य निवडणूक आयोगाकडून राजकीय पक्ष म्हणून त्यांची नोंदणी करण्यात येते.

३. या अधिसूचनेतील तरतुदीनुसार प्रत्येक नोंदणीकृत राजकीय पक्षाने "वार्षिक लेखा परिक्षण लेख्याची" एक प्रत व संबंधित कायद्यान्वये भरलेल्या "वार्षिक आयकर विवरणपत्राची" एक प्रत संबंधित वित्तीय वर्ष संपल्यानंतर एक वर्षाच्या आत आयोगाच्या कार्यालयास देण्याची तसेच आदर्श आचारसंहिता आणि आयोगाचे निर्देश व सूचनांचे पालन करण्याची तरतूद आहे. जर एखाद्या राजकीय पक्षाने उपरोक्त चारपैकी एकाजरी गोष्टीचे पालन केले नाही तर त्यांची नोंदणी रद्दबातल ठरवून त्यांना नोंदणीकृत राजकीय पक्षांच्या यादीतून काढून टाकण्याचीदेखील तरतूद आहे.

४. " लोकांचे दोस्त (Friends of People) " या पक्षाची नोंदणी राज्य निवडणूक आयोगाच्या पत्र क्रमांक - रानिआ/ रापनों-२००६/प्र.८३ /का.११, दि.२०-११-२००६ अन्वये करण्यात आलेली आहे. या नोंदणीकृत पक्षाने खाली दर्शविल्याप्रमाणे आवश्यक असलेले " वार्षिक लेखा परिक्षण लेख्याची" प्रत व "वार्षिक आयकर विवरणपत्राची " प्रत सादर केलेली नाही.

| प्राप्त न झालेले कागदपत्रांचे वर्ष | |
|---|---|
| आयकर विवरणपत्र | लेखा परिक्षित लेखा |
| २००६-०७ ते १३-१४ | २००६-०७ to १३-१४ |

५. " लोकांचे दोस्त (Friends of People)" यांना खाली दर्शविल्याप्रमाणे एकूण चार पत्रांद्वारे सर्व प्रलंबित कागदपत्रे त्वरित सादर करण्याबाबत विनंती करून सदर कागदपत्रे सादर न केल्यास नियमाप्रमाणे निलंबनासह सर्व पुढील कार्यवाही करण्यात येईल अशा सूचना देण्यात आल्या होत्या.

(i) क्रमांक-रानिआ/रापनों-२०१०/प्र.क्र.१०/का.११, दि.१९/०७/२०१० (यापत्राद्वारे फक्त कागदपत्रे देण्याची विनंती करण्यात आली.)

(ii) क्रमांक-रानिआ/रापनों-२०१०/प्र.क्र.१०/का.११, दि.१४/१२/२०१० (या पत्राद्वारे नोंदणी तात्पूरती निलंबित करण्यात येईल असे कळविण्यात आले.)

(iii) क्रमांक-रानिआ/रापनों-२०१०/प्र.क्र.१०/का.११, दि.०७/०१/२०११ (या पत्राद्वारे नोंदणी निलंबित करण्यात येईल असे कळविण्यात आले.)

(iv) क्रमांक-रानिआ/रापनों-२०११/प्र.क्र.६१/का.११, दि.२०/०९/२०११ (या पत्राद्वारे आयोगाकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल अशा सूचना देण्यात आल्या )

तसेच आयोगाच्या क्रमांक-रानिआ/रापनों-२०११/प्र.क्र.६१/का.११, दि. २२/११/२०१२ रोजी सदर कागदपत्रे आयोगास सादर न केल्यामुळे पक्षाला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

६. वरील पत्रांना तसेच कारणे दाखवा नोटीसीला कसलाही प्रतिसाद न देता सदर कागदपत्रे सादर न केल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाकडून सदर पक्षाला आदेश क्र.रापनों-

२०१५/प्र.क्र.२१/का.११, दि.१७.११.२०१५ द्वारे खाली नमूद केल्याप्रमाणे नोटीस बजावण्यात आली :

*" या कागदपत्रांची पूर्तता आपणाकडून वरील मुदतीत न झाल्यास किंवा आपणाकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यास आपल्या पक्षाची नोंदणी रद्द करण्यात येईल. "*

तसेच प्रमुख वर्तमानपत्रामध्ये या आशयाचे प्रसिध्दीपत्रक दि. २३.११.२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते. " लोकांचे दोस्त (Friends of People) " यांच्या कार्यालयाला पाठविलेली नोटीस डाक खात्याकडून बटवडा न होता, आयोगाच्या कार्यालयाला परत आली. तसेच सदर पक्षाने प्रसिध्दी पत्रकाला देखील कोणताही प्रतिसाद न देता विहित कागदपत्रे आयोगास सादर केली नाहीत.

७. ज्याअर्थी, " लोकांचे दोस्त (Friends of People) " यांची राजकीय पक्ष म्हणून २००६ मध्ये नोंदणी झालेली होती व ज्याअर्थी या पक्षाने अधिसूचनेतील तरतुदीनुसार दरवर्षी आयोगाच्या कार्यालयास "वार्षिक लेखा परिक्षण लेख्याची" प्रत व "वार्षिक आयकर विवरणपत्राची" प्रत सादर केली नाही व ज्याअर्थी, या पक्षाला २०१५ मध्ये नोटीस देऊनही त्यांनी विहित कागदपत्रे आयोगास सादर केली नाहीत. त्याअर्थी, सदर पक्षाची नोंदणी पुढे चालू ठेवण्याचे काहीही प्रयोजन दिसून येत नाही. म्हणून वरील सर्व बाबींचा विचार करुन " लोकांचे दोस्त (Friends of People) " या पक्षाची राजकीय पक्ष म्हणून केलेली नोंदणी या आदेशाद्वारे रद्द करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

RPAD

निर्गमित
दिनांक २९.४.१६
सही

20/4/2016

( डॉ. प्रदीप व्यास )
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

O/C
२०१०८१९६

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
" लोकांचे दोस्त (Friends of People)"
द्वारा शंकर काशिराम घोगीकर, १-३,
सत्यशील को.ऑ.सो., वर्षानगर, पार्क साईट कॉलनी, विक्रोळी (प.), मुंबई ४०००७९